International Journal of Humanities and Arts
www.humanitiesjournals.net
Online ISSN: 2664-7702, Print ISSN: 2664-7699
Received: 05-08-2022; Accepted: 10-09-2022; Published: 25-09-2022
Volume 4, Issue 1, 2022, Page No. 70-75

# राजर्षी शाहू महाराजांची: धोरणात्मक शैक्षणिक दृष्टी

[1] **डॉ. आनंदा पांडूरंग कांबळे**

[1] एम. ए., सेट, एम. फिल., पीएच. डी. राज्यशास्त्र विभाग प्रमुख, भोगावती महाविद्यालय, कुरुकली. महाराष्ट्र, भारत

**DOI:** https://www.doi.org/10.33545/26647699.2022.v4.i1a.213

**सारांश**

राजर्षी शाहू महाराज यांची दूरदृष्टी भारताच्या पुरोगामी वैचारिक व्यवहारांमध्ये दूरगामी बदल घडवणारी व प्रभाव टाकणारी ठरली आहे. जनतेच्या गरजा भागवणे म्हणजे राज्यकारभार चालवणे किंवा करणे. इतक्या मर्यादित दृष्टीने राज्यकर्ते त्या काळात राज्यकारभाराकडे पाहत होते. पण यातून पुरेशा सामाजिक, आर्थिक, राजकीय सुधारणा होत नव्हत्या. तर फक्त लोकांच्या गरजा किंवा प्रश्न निर्माण झाल्यासच, ते प्रश्न सोडवण्याचे काम त्यावेळी राज्यकर्ते करत होते. या इतर राज्यकर्त्यांच्या पेक्षा राजर्षी शाहू महाराजांची दृष्टी वेगळी होती. राजर्षी शाहू महाराजांनी जनतेच्या तत्कालीन गरजा तर पूर्ण केल्याच, पण पारंपरिक धर्म व्यवस्थेने ज्या-ज्या समता पूरक गोष्टी नाकारल्या होत्या, त्यामध्ये स्वतःहून बदल केला. हे त्यांच्या राज्यकारभाराचे क्रांती सूत्र होते. त्यांनी राज्यसंस्थेचा वापर करून समताधिष्टीत समाज रचना बनवण्यासाठी समाजाच्या सर्व क्षेत्रात नवीन न्यायाच्या संकल्पनेची प्रस्थापना केली.

राजर्षी शाहू महाराजांचे कार्य पाहिले असता, ते काळाच्या पुढे असलेले दिसतात. पितृसत्ताक कुटुंब पद्धतीचा समाज स्त्री शोषणात जगत असताना, राजर्षी शाहू महाराज स्त्री शिक्षणावर भर देतात. स्त्रियांना शिक्षण देणे, विधवा पुनर्विवाहाला कायदेशीर मान्यता देणे, बालविवाह रोखण्यासाठी प्रयत्न करणे, देवदाशी प्रथेवर बंदी घालणे अशा व्यापक अर्थानी स्त्रियांच्या सर्वांगीण शोषणमुक्तीचे कार्य राजर्षी शाहू महाराज करताना दिसतात. शेतकऱ्यांसाठी बाजारपेठा, लघुउद्योग, वस्त्र व विणकाम उद्योग, सहकारी संस्था यांचे निर्माण अशा प्रकारे शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासाला राजर्षी शाहू महाराज हातभार लावतात. कलाक्षेत्राला राजाश्रय दिल्यानेच संगीत, चित्रपट, चित्रकला, लोककला यांचा विकास आणि विस्तार कोल्हापूर संस्थानाने केलेला पाहावयास मिळतो. या सर्व कार्यात धोरणात्मक बदल घडवून आणण्यासाठी राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण शैक्षणिक कार्याने पारंपरिक विषमतावादी प्रथा, परंपरा, चालीरीती, रुढी व न्यायाची कल्पना यांना विरोध करून, नवीन सामाजिक न्यायाची शास्त्रशुद्ध व व्यवहारवादी संकल्पना राजर्षी शाहू महाराज निर्माण करताना पहावयास मिळतात.

**मूलभूत शब्द:** राजर्षी शाहू महाराज, शैक्षणिक दृष्टी, सामाजिक न्याय, सक्तीचे व मोफत शिक्षण, शिष्यवृत्ती, वस्तीगृहाची व्यवस्था, आरक्षण

## प्रस्तावना

महात्मा जोतिबा फुलेंनी सत्यशोधक दृष्टिकोनातून सामाजिक व सांस्कृतिक सुधारणा घडवून आणण्याचे काम केले. महात्मा फुलेंचे कार्य हे सर्वांगीण व सर्वव्यापी होते. येथील वर्णवाद, जातीवाद यांच्यातून तयार झालेली सामाजिक, आर्थिक शोषणाची रचना नष्ट करणे, हे महात्मा

जोतिबा फुले यांचे आद्य कार्य होते. सामाजिक व सर्वांगीण क्रांतिकारक धोरणाच्या अनुषंगाने महात्मा फुलेंनी केलेल्या कार्याचा प्रभाव राजर्षी शाहू महाराजांच्या वर होता. पर्यायाने महात्मा फुलेंच्या क्रांतिकारी कार्याचे गमक महात्मा फुले यांच्या नंतर शाहू महाराजांना अत्यंत चपकलपणे उमगलेले दिसून येते. समाजातील सर्व घटकांचा सर्वांगीण दृष्टिकोनातून विकास साधायचा असेल, तर मुळात शोषणावर आधारलेली पदसोपन प्रक्रिया किंवा उतरंडीची समाज रचना समूळ नष्ट करणे, उच्चाटन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे हे राजर्षी शाहू महाराजानी ओळखले होते. त्यामुळेच वेगवेगळया दृष्टिकोनातून ह्या विषमता मुलक सामाजिक रचनेवर प्रहार करत असताना राजर्षी शाहू महाराजांची दृष्टी हि सर्वांगीण बनलेली दिसते किंवा पर्यायाने सर्वच क्षेत्रात घेतलेल्या क्रांतिकारी निर्णयाने विषमतावादी समाज रचना नष्ट करून सामाजिक न्यायाचे तत्व अस्तित्वात आणणारे निर्णय व कृती राजर्षी शाहू महाराजांनी केलेले पाहावयास मिळतात. या विषमता मूलक समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखले होते.

## उद्देश

1. राजर्षी शाहू महाराजांच्या प्रजा विकासाच्या सूत्राचा आढावा घेणे.
2. राजर्षी शाहू महाराजांच्या सर्वव्यापी शैक्षणिक दृष्टिकोनाचा परामर्श घेणे.
3. राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याची सामाजिकदृष्ट्या असणारी गरज पहाणे.
4. राजर्षी शाहू महाराजांच्या कृतीतील समाजातील बहुसंख्ये जनतेच्या विकासाचा मुलभूत आराखडा पहाणे.

## संशोधन पद्धती

प्रस्तुत शोधनिबंध लेखनासाठी ग्रंथालयीन संशोधन पद्धतीचा उपयोग केला आहे. प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे. प्राथमिक साधने - यामध्ये राजर्षी शाहू महाराजांच्या चरित्रांचा प्राथमिक संदर्भ घेतला आहे. दुय्यम साधने - यात राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याच्या संदर्भाने लिहिलेले लेख, संदर्भ ग्रंथ, मासिके व इंटरनेट इत्यादीचा आधार घेतला आहे. अध्ययनासाठी आवश्यक ती माहिती उपलब्ध करून त्या साधनसामग्रीचे आकलन करून घेऊन, विश्लेषणात्मक व विवेचनात्मक पद्धतीचा वापर करून सदर शोधनिबंधाची मांडणी केली आहे.

**राजर्षी शाहू महाराजांची सर्वव्यापी धोरणात्मक शैक्षणिक दृष्टी:** भारताच्या पारंपारिक धर्म सत्तेच्या धर्तीवर आधारित समाज रचनेनुसार बहुजनांना शिक्षण घेता येत नव्हते. या व्यवस्थेला राज्यकर्ते पण बळी पडत असत. या सर्व भारतातील राज्यकर्त्यांच्या प्रवासात ज्या काही मूलनिवासी राजांनी आपल्या नीतीधैर्याने व कर्तृत्वाने जगाला विचार मग्न बनवले त्यामध्ये राजर्षी शाहू महाराजांचा क्रम आग्रभागी लागतो. या सर्व पारंपरिक रूढी,प्रथा, परंपरा यांचा वास्तवावर आधारित विचार करावयाचा झाल्यास त्यासाठी सर्वसामान्य जनतेला शिक्षण मिळाले पाहिजे हे त्यांनी ओळखले होते. यासाठी त्यांनी काही शैक्षणिक उपक्रमांचा व योजनांचा वापर केला. ज्यामुळे त्यांचा शैक्षणिक क्षेत्रावर दूरगामी परिणाम झालेला दिसून येतो. राजर्षी शाहू महाराजांच्या सर्वव्यापी शैक्षणिक दृष्टिकोनाचा आढावा घेताना. विद्यार्थ्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण, शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, वस्तीग्रहाची

व्यवस्था, रोजगारामध्ये आरक्षण व शिक्षकांची महत्त्वाची भूमिका अशा व्यापक दृष्टीने राजर्षी शाहू महाराजांनी विचार केलेला दिसून येतो. अशाप्रकारे शिक्षण क्षेत्राचा सर्वव्यापी दृष्टीने शाहू राजांनी विचार केलेला असल्यामुळे शिक्षणाकडे सामाजिक रचनांमध्ये बदल घडवून आणण्याचे प्रभावी साधन म्हणून ते पाहत होते. त्यामुळे सामाजिक रचनांमध्ये सुद्धा झालेले प्रभावी बदल आपल्याला दिसतात.

**मोफत आणि सक्तीचे शिक्षण**

राजर्षी शाहू महाराज असे म्हणतात, "शिक्षणाने आमचा तरणोपाय आहे, असे माझे ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही, असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत. म्हणून सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्तानला अत्यंत आवश्यकता आहे. त्यांच्यामते," विसाव्या शतकातील जीवन कलहातून मानवाला सुखाकडे नेहणारे शिक्षण हे सर्वस्पर्शी साधन आहे. ते वापरून, स्वावलंबनाने स्वतःच्या पायावर उभा राहण्याचा प्रयत्न प्रत्येकाने केला पाहिजे. माझी सर्व प्रजा, मराठी तिसरी इयत्ता जरी शिकून तयार झाली असती, तरी त्यांना राज्यकारभाराचे हक्क आनंदाने देऊन मी आज विश्रांती घेतली असती.

अशाप्रकारे शिक्षणाचे महत्त्व राजर्षी शाहू महाराजांना उमंगले होते. त्यामुळे ते प्रजेच्या शिक्षणासाठी खूप सतर्क असलेले दिसतात. त्यामुळेच त्यांनी सामाजिक क्रांतीचे साधन म्हणून प्राथमिक शिक्षणाची सुरुवात केली. या प्राथमिक शिक्षणाबरोबरच माध्यमिक व उच्च शिक्षण सुरू करण्याबाबत शाहूंचे कार्य होते. फक्त साक्षर प्रजा बनवणे, इतकेच मर्यादित प्रारूप त्यांच्या शिक्षणविषयक दृष्टीचे नव्हते. तर प्रजा सर्वसमावेशक प्रक्रियेमध्ये येणे आवश्यक आहे याच धर्तीवर त्यांनी शिक्षण विषयक वेगवेगळ्या घटकांची निर्मिती केलेली दिसते. त्यांच्या शिक्षण विषयक धोरणात सक्तीचे व मोफत हे दोन शब्द अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्याचबरोबर जे पालक आपल्या पाल्यांना शाळेत पाठवणार नाहीत, त्यांना दंड पण लागू केला गेला होता. यामध्ये प्रजेच्या पालकत्वाची तळमळ पहावयास मिळते. त्यांची दूरदृष्टी इतकी व्यापक होती की, सक्तीच्या व मोफत शिक्षणासाठीच्या धोरणास पूरक संस्थांची निर्मिती त्यातूनच केलेली दिसते. या सर्व कारभाराचा अट्टाहास करताना राजर्षी शाहू महाराजांची क्रांतीदृष्टी दिसते. ते म्हणतात, खालच्या वर्गाच्या लोकांच्या बुद्धीवर व ज्ञानावर हे जे जड व जुलमी बंधन लादले आहे, ती जुगारून देण्याची समाजाच्या अंगी क्षमता येण्यासाठी सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची फार जरुरी आहे. इतकेच नाही तर सामाजिक विषमता रचनेची पानेमुळे धार्मिक तत्त्वज्ञानात असून, ते तत्त्वज्ञान संस्कृत भाषेतून स्पष्ट केले जाते. या संस्कृत भाषेवर एका विशिष्ट वर्गाची मक्तेदारी होती. पर्यायाने धार्मिक विधी व कार्य ही त्यांच्याकडून समजून घ्यावे लागत असत. त्यामध्ये खरी गुलामगिरी धडलेली आहे. याची जाणीव राजर्षी शाहू महाराजांना झाल्यामुळे संस्कृत शिक्षणावरील एका ठराविक वर्गाची मक्तेदारी नष्ट करण्यासाठी वैदिक शाळांची स्थापना केली होती. तसेच गाव पातळीवर प्रशासन चांगल्या प्रकारचे चालावे यासाठी ग्राम प्रमुखाला प्रशिक्षण देऊन चांगला प्रशासक बनवण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी शाळा काढल्या होत्या. यावरून त्यांचा शिक्षण विषयक सर्वांगीण बदलाचे साधन म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन दिसून येतो.

**शिष्यवृत्ती**

राजर्षी शाहू महाराजांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. तरीही त्यांना त्या शिक्षणाचा सर्वांगीण विस्तार होईल याबाबत निश्चितता वाटत नव्हती. कारण सामाजिक दृष्ट्या मागास समाज आर्थिक दृष्ट्या ही मागासच असतो. तो साधनसंपत्तीपासून वंचित असतो. साधनसंपत्ती जवळ नसल्यामुळे उच्च जातींसारखे शिक्षण घेणे त्यांना शक्य नव्हते. कारण सामाजिक दृष्टीने एका बाजूला मागास जातींचा शिक्षणाचा हक्क नाकारला जात होता तो राजर्षी शाहू महाराजांनी देवू केला. तरीही आर्थिक मागासलेपणामुळे तो हक्क उपभोक्ता येणार नाही याचीही जाण राजर्षी शाहू महाराजांना झाली व सामाजिक प्रतिकूल परिस्थितीतील घटकांना त्यांनी शिष्यवृत्तीची व्यवस्था केली. कारण शिक्षण सक्तीचे व मोफत केले, तरी समाजातील बऱ्याच घटकांना आर्थिक मदतीशिवाय शिक्षण घेणे शक्य होणार नाही. ही जाणणारे राजर्षी शाहू महाराज हे खऱ्या अर्थाने लोकराजा ठरतात. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे ही त्या काळातील नवीन संकल्पना होती. तसेच ती सर्व समाज घटकांना देणे ही त्याहीपेक्षा क्रांतिकारी घटना होती. ही क्रांतिकारी घटना राजर्षी शाहू महाराज आपल्या संस्थानात धोरण म्हणून स्वीकारतात. यावरून त्यांच्या लोककल्याणाची दृष्टी स्पष्ट होते.

**वस्तीगृहाची व्यवस्था**

राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात शिक्षण सक्तीचे व मोफत केले. तरी गाव खेड्यापासून लांब शहरात शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांचे हाल होत होते. कारण त्यांच्या राहण्याची सोय होत नसे. विद्यार्थ्यांचा शहरांमध्ये आल्यानंतर राहण्याचा प्रश्न सुटावा यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी विद्यार्थी वस्तीगृहाची उभारणी कोल्हापुरात केली. मराठा, जैन, लिंगायत, सारस्वत, मुस्लिम, दैवज्ञ, पांचाळ, शिंपी, सुतार, कायस्थ, प्रभू, दलित यांच्या विद्यार्थ्यांकरिता विद्यार्थी वस्तीगृह तयार केली. या विद्यार्थी वस्तीगृहातून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये जातीद्वेष कमी होण्यास मदत होईल हा त्यामागचा उदात्त हेतू देखील दिसून येतो. अशा उदात्त हेतूने निर्माण केलेल्या वस्तीगृहाच्या चळवळीमुळे कोल्हापूरला 'मदर ऑफ बोर्डिंग हाऊसेस' म्हणजेच विद्यार्थी वस्तीगृहाची जननी किंवा माता म्हणणे वावगे ठरणार नाही. या वस्तीगृहाच्या चळवळीमुळेच कोल्हापूर संस्थानातील विविध समाजातील मुले शिकून पुढे आलेली दिसतात. तसेच राजर्षींनी त्यांच्या शिक्षणानंतर शिक्षणाचा वापर संस्थानांमध्ये करून घेतल्याचे ही दिसून येते किंवा पहावयास मिळते.

**आरक्षण**

समाजातील उपेक्षित - वंचित वर्गाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व त्यांना निर्णय प्रक्रियेत सामील करून घेण्यासाठी राखीव जागांची किंवा आरक्षणाची कल्पना महात्मा ज्योतिबा फुले यांनी मांडली होती. कोल्हापूर संस्थानात शिक्षणाचे दरवाजे खुले झाल्यानंतर शिकून तयार झालेल्यांना रोजगार मिळावा, नोकरी मिळाव्यात व त्यांचा शिक्षणावरील विश्वास दृढ व्हावा यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानातील मागासजातींच्यासाठी ५०% जागा आरक्षित ठेवण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला.

समाजातील ठराविक उच्च जातीच अनंत काळापासून नोकऱ्यांवर स्वतःची मक्तेदारी निर्माण करून बसल्या होत्या. ती मक्तेदारी नष्ट करून, संस्थानातील नोकऱ्या उपेक्षित समाजातील घटकाला देण्याचे काम राजर्षी शाहू महाराजांनी केले. त्यामुळेच आरक्षणाला राजर्षी शाहू महाराज समाजाच्या सर्वक्षेत्रातील मक्तेदारी मोडून

काढण्याचे साधन समजत होते. राजर्षी शाहू महाराज म्हणत, सर्व जातीचे लोक पुढे येऊन सामाजिक, औद्योगिक, शैक्षणिक, सरकारी नोकरी इत्यादी सर्व बाबतीतील आपापली जबाबदारी पुरी पाडण्याचे सामर्थ्य त्यास येणे याला मी जात वर प्रतिनिधित्व म्हणतो, मागे पडलेल्यांना अशा प्रकारे पुढे येण्यास उत्तेजन देणे हे कर्तव्य आहे असे मी मानतो. अशा प्रकारे राजर्षी शाहू महाराजांचा शिक्षणाच्या सर्वव्यापी दृष्टिकोनातून जातीयवादी शक्तींच्या विरोधात समतेचा लढा होता. अशी समष्टी राजर्षींच्या शैक्षणिक कार्याला होती.

याबरोबरच उपेक्षित समाजातील घटकांना किंवा विद्यार्थ्यांना न्याय मिळायचा असेल, तर शिक्षक सुद्धा सर्वच समाजातून आले पाहिजेत असे त्यांचे मत होते. पारंपरिक व्यवस्थेत एका ठराविक समाजातूनच शिक्षक येत असल्यामुळे त्यांना उपेक्षित समाजातील विद्यार्थ्यांच्या समस्या समजून, त्यांना प्रेरणा देण्याचे कार्य होत नसे. यासाठी सर्वच जातीतील शिक्षक तयार व्हावेत अशी एक व्यवस्था राजर्षी शाहू महाराजांनी तयार केली. तसेच शिक्षक हा उत्तम प्रतीचा घडविण्यासाठी 'शिक्षक मेरिट प्रमोशन' योजना सुरू करून ती यशस्वी केली' शिक्षणासाठीच्या या पायाभूत सुविधा त्यांनी निर्माण केलेल्या दिसून येतात.

**राजर्षी शाहू महाराजांची शैक्षणिक दृष्टी व सद्यस्थिती:** राजर्षी शाहू महाराजांची शैक्षणिक धोरण हे सर्व समावेशक व सर्वव्यापी होते. तसेच ते सामाजिक विषमतेच्या मूळ स्तोत्राला नष्ट करणारे होते. कारण समाजातील वर्ण आणि जातीभेद जो अन्याय, अत्याचार, शोषण तयार करतो. त्याला शिक्षणाने धक्का देण्याचे काम राजर्षी शाहू महाराज करीत होते. सामाजिक भेदभाव व ऐतिहासिक अन्याय यांना नष्ट करून सामाजिक विषमतेत सर्वात जास्त भरडले गेलेल्या व्यक्तीला आत्मविश्वास देण्याचे व आत्मनिर्भर बनवून इतरांवरील होणारा अन्याय रोखण्यासाठी पुढे आणण्याचे साधन म्हणून राजर्षी शाहू महाराज शिक्षणाकडे पाहत होते. तीच सर्व समावेशक दृष्टी असणारे शिक्षण अस्त्र सद्यस्थितीत अस्तित्वात येत नाही. हे आजच्या राजकीय विचार प्रक्रियेचे अपयश आहे असे म्हणावे लागेल. कारण देशाच्या उन्नतीमध्ये जातीभेद व वर्णभेद हा सर्वात मोठा अडथळा आहे आणि त्याचे उच्चाटन होऊन समता देशाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक आहे हे राजर्षी शाहूंनी त्यावेळी ओळखले होते. पण सद्यकालीन राजकीय प्रक्रियेमध्ये त्या मूलभूत तत्वालाच छेद दिलेला दिसून येतो.

राजर्षी शाहू महाराजांच्या मते, इंग्रजी अधिकाऱ्यांच्या हातून सत्ता काढून घेऊन ती विद्यासंपन्न अशा अल्पसंख्यांक ब्राह्मण वर्गाच्या हाती देणे मला बिलकुल मान्य नाही, या देशातील बहुसंख्य जनता सुखी जीवनाची भागीदार करावयाची असेल तर आधी 'सोशल रिफॉर्म' होऊन आपली एकी झाली पाहिजे. म्हणजेच आम्हाला स्वराज्याचे संपूर्ण फायदे मिळतील. कारण जोपर्यंत समाज जाती बंधनात अडकून राहील, तोपर्यंत स्वातंत्र्याचे फायदे सर्व समाज घटकांना घेता येणार नाहीत. राजर्षी शाहू महाराजांच्या सर्वांगीण दृष्टीतून तयार झालेली सांस्कृतिक लढाई विसरणारे राजकीय नेतृत्व उदयास आल्याने वर्ण व जातीभेदाच्या विरुद्धची लढाई लोप पावलेली दिसते.

स्वातंत्र्यलढ्याच्या कालखंडात आधी सामाजिक सुधारणा की राजकीय सुधारणा असा वाद सुरू झाला होता. याबाबत राजर्षी शाहू महाराज म्हणतात, राजकीय सुधारणा अगोदर पाहिजेत आणि सामाजिक सुधारण्याची तुर्त जरुरी नाही. असे प्रतिपादन ऐकू येते तेव्हा तेथेच काहीतरी

पाणी मुरत आहे असे समजावे. हे बोलणे कपटी काव्याचे असते. म्हणूनच राजर्षी शाहू महाराजांच्या मते, सामाजिक सुधारणा अधिक एकी म्हणजेच स्वराज्य होय.स्वातंत्र्यानंतरच्या राजकीय सरकारांनी उच्च शिक्षणाची व्याप्ती वाढवली. पण उपेक्षित घटकांना त्यामध्ये स्थान मिळणे कठीणच होते. सर्वसामान्य विद्यार्थी १९९०च्या दशकानंतर काही प्रमाणात उच्च शिक्षणात आला. पण त्यालाही मर्यादा असताना दिसते. राजर्षी शाहू महाराजांनी जसे १२५ वर्षांपूर्वी शिक्षणाचे धोरण आखणारे, त्यात काम करणारे व शिक्षण घेणारे हे सर्व समाजातील असावे असे ठरवले होते व त्यानुसार राज्यकारभार चालवला होता, तसे पाहता धोरण निर्मितीच्या पातळीवर या दृष्टिकोनातून सद्यस्थितीमध्ये अजूनही अंधार दिसतो आहे. त्यामुळे स्वातंत्र्यानंतरच्या कल्याणकारी राज्याच्या तरतुदींचा फायदा आधीपासूनच ज्यांच्याकडे सांस्कृतिक भांडवल आहे, अशाच वर्गाने जास्तीचा घेतलेला दिसून येतो.

## निष्कर्ष

त्यामुळे राजर्षी शाहू महाराजांच्या सारखी सर्व समावेशक शैक्षणिक दृष्टी घेऊन, नव्या राजकीय विचारात सामाजिक न्याय समोर ठेवून शैक्षणिक धोरण तयार करू शकेल, असा सामाजिक न्याय केंद्रस्थानी ठेवणारा नवा राजकीय विचार तयार होत नाही, तो पर्यंत राजर्षी शाहू महाराजांच्या सर्वांगीण शैक्षणिक धोरणात्मक दृष्टीला समोर ठेवून काम करणाऱ्या सामाजिक संस्था भारतात शैक्षणिक क्रांतीची दिशा ठरवू शकणार नाहीत. ती क्रांती झाली तरच सद्यकालीन दूषित राजकीय विचारांच्यामुळे नव्याने उपेक्षित होणारा पारंपरिक उपेक्षित समूह मुख्य प्रवाहाशी नव्याने जोडता येणार नाही. यासाठी परत एकदा नव्याने राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचे सामाजिक, राजकीय,शैक्षणिक, आर्थिक, प्रशासकीय अशा सर्व पातळीवर पुनर्जीवन करणे काळाची गरज बनली आहे. तरच आपण समाजातील सर्व घटकांना सर्वसमावेशक न्याय देऊ शकतो.

## संदर्भ ग्रंथ


1. डॉ.जयसिंगराव पवार, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर २००१.
2. डॉ.रमेश जाधव,लोकराजा शाहू छत्रपती, शैलेंद्र प्रकाशन, मुंबई १९९७.
3. भोसले, एस.एस. (सं.),. क्रांतीसुक्ते: राजर्षी शाहू, निर्मल प्रकाशन, कोल्हापूर १९७५.
4. डॉ.जयसिंगराव पवार,राजर्षी शाहू - एक दृष्टीक्षेप, भाग्यश्री प्रकाशन, कोल्हापूर २०१९.
5. पानसरे गोविंद, राजर्षी शाहू वसा आणि वारसा, लोकवाङ्मय गृह, मुंबई २०११.
6. रा.तु.भगत, राजर्षी शाहूचे शिक्षण विचार व कार्य, चैतन्य प्रकाशन कोल्हापूर २००६.